सकाळ

सातारा, शुक्रवार,
८ जुलै २०२२

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# सैनिकांच्या बलिदानामुळे भारत सुरक्षित

## कर्नल भालसिंग; कोरेगावातील कॉलेजात ३६ जवानांच्या कुटुंबीयांचा गौरव




**कोरेगाव : डी. पी. भोसले महाविद्यालयात जवानांच्या कुटुंबीयांचा गौरव करताना कर्नल एम. व्ही. भालसिंग. त्या वेळी प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत, प्रा. डी. डी. भोसले, सी. आर. बर्गे आदी.**

कोरेगाव, ता. ७ : भारतीय सैन्य दलातील सैनिक देशरक्षणार्थ करत असलेला असीम त्याग व प्रसंगी देत असलेल्या आपल्या बलिदानामुळेच आपला देश सुरक्षित आहे, असे प्रतिपादन कर्नल एम. व्ही. भालसिंग यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या येथील डी. पी. भोसले महाविद्यालयात स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त २२ महाराष्ट्र बटालियनच्या मार्गदर्शनाखाली आयोजित 'शहिदोंको शत शत नमन' अर्थात कोरेगाव तालुक्यातील ३६ जवानांच्या कुटुंबीयांचा गौरव समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून कर्नल भालसिंग बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत होते. या वेळी उपप्राचार्य एस. एन. कोळेकर, 'एक्स डिपीयन्स'चे पदाधिकारी सी. आर. बर्गे, जिमखाना विभागप्रमुख आणि कॅप्टन प्रा. डी. डी. भोसले, प्रा. सी. व्ही. जावळे, प्रा. एस. बी. चव्हाण, सुभेदार जयराम कोळी, सचिन पनवेलकर, अमोल कदम, हवालदार राजेंद्र पाटील, जयवंत घाडगे आदी उपस्थित होते. सेवानिवृत्त कॅप्टन महादेव भोसले म्हणाले, ''देशाच्या संरक्षणामध्ये सैनिकांचे योगदान मोलाचे असून, ते घडविण्यात राष्ट्रीय छात्र सेनेचाही तितकाच महत्त्वपूर्ण सहभाग आहे.''

सी. आर. बर्गे यांनी देशरक्षणार्थ सैनिक घडवण्याचे काम डी. पी. भोसले महाविद्यालय करत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी भारतीय सैन्य दल कोणत्याही परकीय, बाह्य आक्रमणाला तोंड देण्यासाठी समर्थ असून, त्यात सातारा जिल्हा आघाडीवर असल्याचा अभिमान वाटतो, असे सांगितले.

जिमखाना विभागप्रमुख व कॅप्टन प्रा. बी. डी. भोसले यांनी प्रास्ताविकात महाविद्यालयाचे दोन जवान देशरक्षणार्थ हुतात्मा झाल्याचे जेवढे दुःख त्यांच्या कुटुंबीयांना आहे. तेवढे दुःख आम्हालाही आहे. मात्र, तेवढाच आम्हाला अभिमानही असल्याचे सांगितले. संपदा जगताप व पूजा भोसले यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एस. व्ही. मोरे यांनी आभार मानले.